Maharashtra State Board Of Secondary And Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board,
Plot No. 27 & 28, Opposite The St. Lawrence School, Sector 16-A, Vashi, Navi Mumbai, Maharashtra-400 703

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, प्लॉट नं. 27 व 28, सेंट लॉरेन्स स्कूल समोर, सेक्टर 16-अ, वाशी, नवी मुंबई-४०० ७०३

Telephone : २७६६०९४५, २७८८१०७७, २७८८१०७५, २७८९९९८७ * Fax : २७६५९४९१/२७८८१३४९
Email : sschsc.mumbaiboard@gmail.com * Website :- www.sscboardmumbai.in

क्र.मुविमं / खा.वि / ३४६९
वाशी नवी मुंबई ४००७०३
दि. ०१ / ०८ / २०२६

प्रति,
१.मा.महासंचालक माहिती व जनसंपर्क संचालनालय,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई३२
२.मा.विभागीय प्रसिध्दी उपसंचालक,पुणे / नागपुर / छत्रपती संभाजीनगर / मुंबई / कोल्हापुर / अमरावती / नाशिक / लातूर / कोकण.
३.मा.संचालक दुरदर्शन केंद्र,वरळी,मुंबई३०
४.मा.संचालक आकाशवाणी,मुंबई केंद्र नवीन प्रसारण भवन,बॅकबे रेक्लमेशन,आमदार निवासजवळ, मुंबई २०
५.मा.संचालक आकाशवाणी केंद्र,
पुणे / नागपुर / छत्रपती संभाजीनगर / मुंबई / जळगांव / सांगली / कोल्हापुर / सातारा / सोलापूर / नाशिक
६.सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी
७.मा.संपादक,सर्व वृत्तवाहिन्या व वृत्तपत्रे

विषय : माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रु / मार्च २०२७ परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट (अर्ज क्र.१७ अन्वये) होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नावनोंदणी प्रक्रिये बाबत.

महोदय,

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रु / मार्च २०२७ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस खाजगीरित्या अर्ज क्र.१७ प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नावनोंदणी प्रक्रिये बाबतचे प्रकटन या पत्रासोबत जोडलेले आहे. सदर प्रकटनास आपल्या कार्यक्षेतील वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दुरदर्शन केंद्रांनी प्रादेशिक बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी. ही विनंती.

आपली विश्वासू

(ज्योत्स्ना शिंदे-पवार)
विभागीय सचिव
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी,नवी मुंबई - ४०० ७०३

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

## खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज

### ॥ प्रकटन ॥

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं. १७ भरुन परीक्षेस प्रविष्ट होण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

इ. १०वी व इ. १२ वी परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थ्यांकरिता सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालये मंडळाच्या अटी शर्तीनुसार नावनोंदणी करण्याकरिता उपलब्ध आहेत. यासंदर्भातील सर्व माहिती व मार्गदर्शक पुस्तिका मंडळाच्या **http://www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच अधिक माहितीसाठी सर्व विद्यार्थी/शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या कार्यकक्षेतील विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

१. फेब्रु-मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत.

| अ.क्र | तपशील | नियमित /विलंब /अतिविलंब शुल्काने नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखा |
|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांनी **नियमित** नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन अर्जाची प्रत (print out), ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोहोचपावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे. | शनिवार दि. ०१/०८/२०२६<br>ते<br>बुधवार दि. ३०/०९/२०२६ |
| २. | विद्यार्थ्यांनी **विलंब** शुल्काने नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन अर्जाची प्रत (print out), ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पाहोचपावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे. | (प्रति विद्यार्थी रू.१००/-)<br>गुरुवार दि. ०१/१०/२०२६<br>ते<br>गुरुवार दि. १५/१०/२०२६ |
| ३. | विद्यार्थ्यांनी **अतिविलंब** शुल्काने नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन मूळ अर्ज, ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोहोचपावती च्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे. | (प्रति विद्यार्थी प्रति दिन रू.२०/-)<br>शुक्रवार दि. १६ /१०/२०२६<br>ते<br>शनिवार दि.३१/१०/२०२६ |

२. खाजगी विद्यार्थ्यांना इ. १० वी व इ. १२वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन (offline) अर्ज स्वीकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

३. खाजगी विद्यार्थ्यांनी इ. १०वी/इ. १२वी साठी नावनोंदणी अर्ज त्यांच्या यापूर्वी शिकलेल्या शाळा /उच्च माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालयामधून भरणे अनिवार्य आहे.त्यासाठी त्यांनी मागील शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतिक क्रमांक, विषय योजना, माध्यम, शाखा (Stream) व इतर आवश्यक माहिती घेऊनच नोंदणी करावी व परराज्यातील/परदेशातील विद्यार्थ्याने सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या रहिवासी दाखल्यावरील पत्ता नमूद करणे आवश्यक आहे.

H:\खाजगी विदयार्थी\10वी १२ वी २०२७ खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज.docx-12

४. नावनोंदणी अर्ज करतांना विद्यार्थ्यांनी http://www.mahahsscboard.in या संकेतस्थळावरील Student Corner या option चा वापर करावा, अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी / इंग्रजीमधून उपलब्ध आहेत, त्या वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी.

५. विद्यार्थ्यांने अर्ज भरण्याकरिता १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), नसल्यास द्वितीयप्रत व प्रतिज्ञापत्र २) आधारकार्ड ३) स्वतःचा पासपोर्ट आकारातील फोटो स्वतःजवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरताना सदर मूळ कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत. काही कारणास्तव विद्यार्थ्यांकडे दुय्यम शाळा सोडल्याचा दाखला असेल तर त्याची मूळ प्रत जोडणे आवश्यक आहे.

६. कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर / मोबाईलद्वारे कागदपत्रांचे फोटो (pdf) काढून ते upload करावेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य आहे.

७. विद्यार्थ्यांनी अर्ज, ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोहोचपावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे नावनोंदणी अर्जावर नमूद केलेल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात विहीत मुदतीत जमा करावयाची आहेत.

**८.खाजगी विद्यार्थी नावनोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे -**

**इ.१०वी व इ. १२वी :- रु.१११०/- नाव नोंदणी शुल्क+ रु.१००/- प्रक्रिया शुल्क (Processing Fee)**

**रु. १००/- विलंब शुल्क प्रति विद्यार्थी**

**रु.२०/-अतिविलंब शुल्क प्रति विद्यार्थी प्रति दिन**

९. इ. १०वी/इ. १२वी फेब्रु मार्च २०२७ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी (फॉर्म नं. १७) नावनोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने (Debit Card/Credit Card/UPI/Net Banking द्वारे) भरणे अनिवार्य राहील. ऑनलाईन पध्दतीने शुल्क जमा केल्याबाबतची पोहोचपावती विद्यार्थी / संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास त्यांच्या Login मध्ये प्राप्त होईल.

१०.अ) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन पध्दतीने होणार असून नावनोंदणी करतांना विद्यार्थ्यांनी त्याच्या यापूर्वी शिकलेल्या माध्यमिक शाळेचे नाव व पत्ता नमूद करणे आवश्यक आहे .या माध्यमिक शाळेने परीक्षेचे आवेदनपत्र, अंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिक/तोंडी, श्रेणी विषय संदर्भातील कामकाज व अनुषंगिक मूल्यमापन तसेच पुढील कार्यवाही करावयाची आहे.

ब) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन पध्दतीने होणार असून नावनोंदणी करतांना विद्यार्थ्यांनी त्याच्या मागील शाळेचे /उच्च माध्यमिक शाळेचे नाव व पत्ता नमूद करणे आवश्यक आहे .या उच्च माध्यमिक शाळेने आवेदनपत्र, अंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिक/तोंडी, श्रेणी विषय संदर्भातील कामकाज व अनुषंगिक मूल्यमापन तसेच पुढील कार्यवाही करावयाची आहे.

११. दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ट व्हावयाचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या प्राधिकृत केलेल्या रुग्णालयाच्या प्रमाणपत्र / UDID Card ची छायाप्रत प्रमाणित करुन अर्जासोबत सादर करावी व आवश्यकतेनुसार विभागीय मंडळ/माध्यमिक महाविद्यालयाकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी.

१२. महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामार्फत इ. ५वी किंवा इ. ८ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना इ. १० वी साठी (१७ नं.) खाजगी विद्यार्थी म्हणून नावनोंदणी करता येईल.

१३. ऑनलाईन अर्ज भरतांना अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत Website वर दिलेल्या Helpline वर संपर्क साधावा.

१४. पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) ऑनलाईन देण्यात येणार आहे, याची नोंद घ्यावी. तसेच पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे (Examination Form) मंडळाने विहीत केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक आहे.

Mali

(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्य मंडळ पुणे -०४

दिनांक - ३१ /०७ /२०२६

H:\खाजगी विदयार्थी\10वी १२ वी २०२७ खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज.docx-13